दिनांक :    .०१.२०२०

**प्रति,**

**मा. केंद्रीय गृहमंत्री,**

**भारत सरकार, नवी देहली.**

**विषय : नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या विरोधात आंदोलन करून देशाच्या संपत्तीची हानी करणाऱ्या धर्मांधांवर कारवाई करण्याविषयी....**

महोदय,

केंद्र सरकारने पाकिस्तान, बांगलादेश, अफगाणिस्तान यांसह अन्य देशांतून भारतात आलेल्या हिंदु, शीख, बौद्ध, जैन, पारसी धर्मीय शरणार्थींना भारताचे नागरिकत्व देणारा 'नागरिकत्व सुधारित कायदा' संमत केला. सरकारच्या या निर्णयामुळे विदेशांतील अल्पसंख्यांकांवर झालेल्या अत्याचारामुळे निर्वासित होऊन भारतात आलेल्या पीडित अल्पसंख्यांकांना न्याय मिळणार आहे. त्यांना भारताचे नागरिकत्व मिळण्यातील अडथळे दूर होणार आहेत. लोकनियुक्त सरकारने लोकसभेत आणि राज्यसभेत बहुमताने संमत केलेला हा कायदा देशभरातील काही धर्मांध आणि कम्युनिस्ट संघटना, तसेच देशविघातक कारवाया करणाऱ्यांना रुचलेला नाही. त्यामुळेच त्यांनी देहली, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल येथे हिंसक आंदोलन चालू केली आहेत. यामध्ये सार्वजनिक मालमत्तेची मोठ्या प्रमाणात हानी करण्यात येत आहे आणि पोलिसांवरही आक्रमणे करण्यात येत आहेत. यामध्ये काही पोलीस गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अतीदक्षता विभागात उपचार चालू आहेत. समाजद्रोही आंदोलकांकडून करण्यात येणारे हिंसक आंदोलन आणि त्यातून होत असलेली हानी ही निषेधार्ह आहे.

*** तरी या संदर्भात आम्ही लक्षात आणून देऊ इच्छितो की...**

१. देहली येथे जामिया मिलिया इस्लामिया विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून ३ दिवस आंदोलन चालू असतांना १५ डिसेंबरला त्यांनी हिंसाचार केला. यात काही बसगाड्या आणि पोलिसांची वाहने जाळली. या वेळी ६ पोलीस, २ अग्नीशमन दलाचे कर्मचारी आणि अन्य असे जवळपास १०० जण घायाळ झाले. या वेळी विश्वविद्यालयाच्या आवारातून पोलिसांवरही दगडफेक करण्यात आली.

२. लखनौ येथील नदवा महाविद्यालयामध्ये १६ डिसेंबरला या कायद्याला विरोध करतांना समाजकंटक विद्यार्थ्यांनी पोलिसांवर दगड, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या आणि चपला फेकल्या.

३. आम आदमी पक्षाचे देहलीतील आमदार अमानतुल्लाह खान यांनी कायद्याच्या विरोधात भडकाऊ विधाने केली. त्यामुळेही काही ठिकाणी हिंसेचे प्रकार घडले.

४. या कायद्याच्या विरोधात काही जणांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रविष्ट केली. त्यावर सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी हिंसाचार करणाऱ्यांना जे सुनावले, ते अतिशय महत्त्वाचे आहे. सरन्यायाधीश म्हणाले की, हा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. सार्वजनिक संपत्तीची कोणालाही हानी करता येणार नाही. आंदोलनासाठी विद्यार्थ्यांना कायदा हातात घेता येणार नाही. आम्ही शांततेने विरोध करणाऱ्यांच्या विरोधात नाही. तुम्ही विद्यार्थी आहात; म्हणून तुम्हाला हिंसाचार करण्याचा अधिकार मिळत नाही. आम्ही तुमचे अवश्य ऐकू, पण प्रथम हिंसाचार थांबवा. हिंसाचार थांबला नाही आणि सरकारी संपत्तीची हानी चालू राहिली, तर सुनावणी करण्यात येणार नाही.

५. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी झारखंड येथील एका प्रचारसभेत म्हटले की, देशात जिथे कुठे हिंसाचार चालू आहे, तो राजकीय प्रेरित आणि पूर्वनियोजितच आहे. हिंसाचार कोण करत आहे, ते कपड्यांवरूनच कळते. यावरूनच हिंसाचार कोण घडवून आणत आहे आणि कोण देशाची अखंडता भेदू पाहत आहे, हेच स्पष्ट होते.

६. अलिगड मुस्लिम विद्यापिठात झालेल्या आंदोलनाच्या वेळी आंदोलक समाजकंटकांनी 'हिंदुत्व की कब्र खुदेगी, एएमयू की धर्तीपर', 'सावरकर की कब्र खुदेगी, एएमयू की धर्तीपर', 'बीजेपी की कब्र खुदेगी, एएमयू की धर्तीपर' आदी घोषणा दिल्या. या विद्यार्थ्यांना नागरिकता कायद्याशी काही देणे घेणे नसून यातून त्यांचा हिंदुत्व आणि स्वा. सावरकर यांप्रती असलेला द्वेष दिसून येतो. यातून या आंदोलकांचा खरा चेहरा समोर आला आहे.

७. केंद्रीय गृहमंत्रालयाने या कायद्याच्या संदर्भात सविस्तर विवेचन करून जनतेच्या प्रश्नांची उत्तरेही दिली आहेत. 'या कायद्याचा कोणत्याही भारतीय मुसलमानांसह कोणत्याही भारतीय नागरिकावर काहीही परिणाम होणार नाही. घटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचा भारतियांना मुक्तपणे उपभोग घेता येणार आहे. या कायद्यासमवेत कोणताही कायदा त्यांचे हे अधिकार रहित करू शकत नाही', असे त्या विवेचनात सांगण्यात आले आहे. असे असतांनाही कायद्याला विरोध करणाऱ्यांकडून कायद्याविषयी जाणीवपूर्वक चुकीची माहिती पसरवली जात आहे. अनेक ठिकाणी झालेल्या आंदोलनांमध्ये अनेकांना 'आपण आंदोलनात कशासाठी सहभागी झालो होतो', याविषयी काहीच ज्ञात नव्हते. वृत्तवाहिन्यांनी काही जणांना त्यांची मते विचारल्यावर काही जण 'दुसऱ्या कोणाला तरी विचारा', असे सांगत. गोवा येथे काही 'टॅक्सी' चालकांनी हा कायदा 'कॅब'ला समर्थन देत असल्याने त्याचा आम्ही विरोध करत आहोत, असे सांगितले.

८. देहली येथे झालेल्या हिंसक आंदोलनात जमियानगर, सीलमपूर आणि दरियागंज परिसरात गाड्या जाळणाऱ्या लोकांना शोधून काढण्यासाठी 'फेस रिकग्नीशन सॉफ्टवेअरचा उपयोग केला जात आहे. गाझियाबाद येथे ३६०० लोकांच्या विरोधात खटले दाखल करण्यात आले आहेत. अशाच प्रकारे उत्तरप्रदेशातही योगी सरकारने ज्या समाजकंटकांनी घरांवर दगड साठवून ठेवले, त्यांचे 'ड्रोन' वापरून चित्रीकरण केले आणि त्याची छायाचित्रे सार्वजनिक केली. याच गोष्टींचा सर्वत्र वापर करून दंगलखोरांची चित्रे सार्वजनिक करणे, तसचे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे साहाय्य घेणे अशा गोष्टी सरकारने करणे आवश्यक आहे.

९. देहली, बंगाल, आसाम आणि उत्तर भारतात कायद्याच्या विरोधात जो हिंसाचार करण्यात आला, त्यामध्ये काही बांगलादेशींचा सहभाग आढळून आला आहे, असे पोलिसांनी सांगितले आहे. यातून बांगलादेशी धर्मांध घुसखोर उघड उघड देशद्रोह करत आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने अशा बांगलादेशी घुसखोरांना शोधून काढणे आवश्यक आहे.

जे समाजकंटक या कायद्याचा विरोध करत हिंसाचार घडवून आणत आहेत, ते घटनाद्रोही आणि लोकशाहीचे विरोधकच आहेत. अशांवर सरकारने कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, समाजकंटकांकडून करण्यात आलेला हिंसाचार सुनियोजित होता. यामागे देशविरोधी आंतरराष्ट्रीय षड्यंत्र असण्याची शक्यता नाकारता येत नाही. **त्यामुळे आम्ही पुढील मागण्या करत आहोत .....**

अ. विश्वविद्यालयाच्या आवारात एवढ्या मोठ्या प्रमाणात दगडफेक करण्यासाठी लागणारे दगड आणि जाळपोळ करण्यासाठी लागणारे इंधन कुठून आले ?, या षड्यंत्रामागे कोण आहे ?, याची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर तत्काळ कठोर कारवाई करावी.

आ. या हिंसाचारामागे सिमी किंवा पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया, तसेच जिहादी आतंकवादी संघटना यांपैकी कोणाचा हात आहे का, याचा तपास करावा.

३. ज्या समाजकंटकांनी पोलिसांवर दगडफेक केली, जाळपोळ केली, कायदा हातात घेत सार्वजनिक संपत्तीची हानी केली, त्यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई करत त्यांच्याकडून हानीभरपाई वसूल करण्यात यावी.

४. जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठ, अलीगड मुस्लिम विद्यापीठ, देहली विश्वविद्यालय आदी विद्यापिठांतील ज्या विद्यार्थ्यांनी या हिंसाचारात सहभाग घेतला, त्यांना तात्काळ विद्यापीठातून काढून टाकावे.

५. विद्यापिठांतील विद्यार्थ्यांना विद्यापिठांत कोणत्याही प्रकारचे राजकीय आणि धार्मिक विषयांवर आंदोलन करण्यास बंदी आणावी, तरीही असे होत राहिल्यास अशा विद्यापिठांवरही बंदी आणून विद्यापिठांवर वचक बसवावा.

६. अलिगड मुस्लिम विद्यापिठात हिंदुत्वाच्या विरोधात विषारी घोषणा देऊन समाजात धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई करावी.

७. देशातील बांगलादेशी धर्मांध घुसखोरांची माहिती गोळा करून त्यांना तात्काळ त्यांच्या देशात हाकलून द्यावे.

आपला विश्वासू,

स

प

क